# ‘सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा’ पुरस्काराचे आयोजन

मुंबई : क्विक हील फाऊंडेशनच्या सामाजिक उत्तरदायीत्व शाखेने पुणे येथे ‘सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा पुरस्कार’च्या २०२४ पर्वाचे आयोजन केले. या समारोहामध्ये शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांना प्रशंसित करण्यात आले. यावेळी फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियत्री बहीणाबाई चौधरी नॉर्थ युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. व्ही. एल. महेश्वरी तसेच २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते.